महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१
C.I.N. No. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/ 27251 दिनांक 17 NOV 2018

# परिपत्रक

**विषय :** सर्व सहाय्यक कर्मचाऱ्यांना **"आरोग्य विमा अनुदान"** लागू करणेबाबत.

******

महावितरण कंपनीतील सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन व त्यांच्या कामाचे योगदान पाहता मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त)/(संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) व कार्यकारी संचालक (मासं) यांचेशी विचारविनिमय करुन **सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रु.५००/- इतकी रक्कम "आरोग्य विमा अनुदान" म्हणून माहे मार्च - २०१८ ते माहे फेब्रुवारी - २०१९ या कालावधीकरिता वेतनातून अदा करण्यास मंजूरी दिलेली आहे.**

- सर्व सहाय्यक प्रवर्ग (विद्युत सहाय्यक, उपकेंद्र सहाय्यक, वीज सेवक, लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा/मासं) ) कर्मचाऱ्यांना **आरोग्य विमा अनुदान मार्च - २०१८ ते माहे फेब्रुवारी - २०१९ या कालावधीकरिता लागू राहील.**
- ज्या सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा मेडीक्लेम योजनेसाठी **रु.५००/- ज्या महिन्यापासून कपात करण्यात आलेली आहे त्या महिन्यापासूनच सदर अनुदान लागू राहील.**
- सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना माहे मार्च -२०१८ ते माहे ऑक्टोंबर -२०१८ पर्यंतचे आरोग्य विमा अनुदान **रु.५००/- प्रतिमाहप्रमाणे एक रक्कमीय रक्कम माहे नोव्हेंबर -२०१८ च्या वेतनामध्ये देण्यात यावी.**
- सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना **माहे मार्च-२०१९ पासून आरोग्य विमा अनुदान अनुज्ञेय राहणार नाही, यांची नोंद कटाक्षाने घेण्यात यावी.**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावरील **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim** येथे व **RAPDRP-Infoportal-(Circular-I.R.Dept.)** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(चंद्रशेखर येरमे)
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महावितरण**

**प्रति,**
सर्व कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी, महावितरण.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
२. संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत सस्नेह :** सर्व कार्यकारी संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत :** मुख्य महाव्यवस्थापक (मासं) / महाव्यवस्थापक (मासं-HRMS) / मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.